**साक्षीदारास शपथ देण्यात आली.**

**नाव – महेश श्रीधर सुर्यपुजारी, वय–५३ वर्षे,**

**व्यवसाय – मुद्रांक विक्रता,**

**राहणार– खंदकरोड, करमाळा, ता. करमाळा,**

**प्रतिवादी क्र. १५ तर्फे साक्षीदार क्र.०२ यांची सरतपासणी प्रतिवादी क्र. १५ तर्फे वकील श्री. एस.ए.रोकडे यांचे तर्फे शपथेवर सुरु –**

आता मला अभिलेखावरील खरेदी दस्त क्र. २१०/२००७ दाखविला. सदरचा दस्त दिनेश नारायण घाडगे व इतरांनी भानुदास बोराटे यांचे हक्कात दि. ११/०१/२००७ रोजी करुन दिलेला आहे. सदरचा दस्त मी टंकलिखीत केला. सदर दस्तातील माहिती लिहून घेणार, देणार यांनी दिली. सदरचा दस्त मी वाचून दाखविला. सदर दस्तावर लिहून घेणार व देणार यांनी सहया केल्या. सदर दस्तावर साक्षीदारांनी सुध्दा स्वाक्षरी केल्या. सदर दस्त निशाण क्र. ४०८ या पूर्वीच देण्यात आलेला आहे. सदरचा दस्त त्यानंतर मी लिहून घेणार देणार यांचेकडे दिला. माझे माहिती प्रमाणे त्यातील मजकुर बरोबर आहे.

**प्रतिवादी क्र. १५ तर्फे साक्षीदार क्र.०२ यांची उलटतपासणी वादी तर्फे वकील श्री. डी.आर.देसाई यांचे तर्फे शपथेवर सुरु –**

मी करमाळा येथे सन १९९४–९५ पासुन मुद्रांक विक्रेत्याचे काम करतो. माझे कडे दस्त लेखनिक म्हणुनि जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडील परवाना नाही. हे म्हणणे खरे आहे की, दस्त लिहिण्यापूर्वी त्या दस्तात नमुद असणा–या मिळकती बाबत एखाद्या न्यायालयात वाद प्रलंबित असलेबाबत विचारणा करत असतो. निशाण क्र. ४०८ वरील दस्ताचे लिखाणापूर्वी लिहून घेणार व देणार यांनी मला वादग्रस्त मिळकती बाबत न्यायालयात वाद प्रलंबित असलेबाबत सांगितलेले नव्हते. मला साक्ष कामी या न्यायालयाकडून समन्स प्राप्त झालेले होते. समन्स प्राप्त झालेनंतर प्रस्तुत प्रकरणातील वादी प्रतिवादी कोण आहेत या बाबीची मी शहानिशा केलेली नाही. हे मला माहिती नाही की, मला ज्या दाव्याचे समन्स प्राप्त झालेले आहे त्या दाव्याचा मुळ दावा क्र.

२६७/१९९९ असा होता किंवा कसे.

प्रश्न – तुम्ही तो दस्त लिहिला व त्या बाबतीत लिहून घेणार व देणार यांनी जी माहिती तुम्हाला दिली त्या माहितीची शहानिशा केली काय ?

उत्तर – त्यांनी सांगितले नुसार मी तयार केला. वेगळी शहानिशा केलेली नाही.

हे मला माहिती नाही की, न्यायालयात एखाद्या वादमिळकती बाबत वाद प्रलंबित असेल तर त्या मिळकतीचे खरेदी खत करता येत नाही किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, लिहून घेणार व देणार यांनी दिलेल्या खोटया माहितीच्या आधारे मी दि. ११/०१/२००७ रोजी खोटया दस्ता बाबतीत लिखाण केले. मी दि.११/०१/२००७ रोजीच्या खरेदी दस्तावरती माझी स्वाक्षरी लावलेली नाही. मी भानुदास बोराटे या इसमास ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, भानुदास बोराटे यांच्या सांगण्यावरुन मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)

दि. ०३–१०–२०२५ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा